**MHSN 05003616-2022**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०३.१०.२०२२ |
| नोंदणी तारीख | : | ०३.१०.२०२२ |
| निकाल तारीख | : | २०.१०.२०२३ |
| कालावधी **०१** व. **००** म. **१७** दि. | | |

**किर.दि.अर्ज नं. १६७/२०२२ मधील नि.१ खालील आदेश**

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ९ नियम ९ प्रमाणे अंतिम हुकूमनामा अर्ज नं.०९/२०१४ हा दावा फेर चौकशीस घेण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे.

२. अर्जदारचे कथन की, अर्जदार यांनी जाबदार यांचे विरुध्द रे.दि.मु.नं. ३४८/२००८ मधील प्राथमिक हुकूमनामा अंतिम होऊन मिळण्याकरीता अंतिम हुकूमनामा अर्ज नं.०९/२०१४ दाखल केलेला होता. सदरचा अर्ज दिनांक १८.१२.२०१८ रोजी अर्जदार गैरहजर म्हणून काढून टाकलेला आहे. अर्जदार ह्या वयस्कर महिला असल्यामुळे त्यांना सदर आदेशाबाबत माहिती घेता आली नाही. त्यानंतर त्यांनी दिनांक ०४.१२.२०२० रोजी नकल्लेसाठी अर्ज दिला व दिनांक २२.१२.२०२० रोजी नक्कला प्राप्त झाल्यानंतर, त्यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला. अर्जदार यांचे कथनानुसार कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन व कार्यालयीन कामकाजावर प्रतिबंध असल्यामुळे अर्जदारला प्रस्तुत कामी नक्कला मिळण्यास उशीर झाला. त्यामुळे, ते सदर कामी हजर राहून काम वेळेत चालवू शकले नाहीत. सबब अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

३. जाबदार क्र. १क यांनी निशाणी १३ अन्वये त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. परंतु पुढे जाबदार यांनी प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १०,०००/– इतक्या दंड रक्कमेवर मंजूर करण्यात याचा अशी विनंती केली आहे.

४. येथे नमुद करणे गरजेचे आहे की, जाबदार क्र.१अ, १ब, २ आणि ३ यांना निशाणी ७ अन्वये रितसर नोटीसची बजावणी होऊनही ते या कामी हजर झाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

५. वरील कथनांवरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.नं. | <u>मुद्दा</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अंतिम हुकूमनामा अर्ज नं.०९/२०१४ हा फेर चौकशीस घेण्यास अर्जदारने त्याच्या अनुपस्थितीचे सबळ कारण दाखवले आहे का ? | **होकारार्थी** |
| २. | काय आदेश ? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अर्जदाराने त्याच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ निशाणी ३ सोबत डि.फा.नं. ०९/२०१४ मधील नि.१ व त्यावरील आदेशाची प्रत दाखल केली आहे. या व्यतिरिक्त कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. तर, जाबदार यांनी कोणतेही कागदपत्रे सादर केलेले नाहीत.

**मुद्दा क्र.१ व २ –**

७. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. पटलावर आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी अंतिम हुकूमनामा अर्ज नं.०९/२०१४ हा रे.दि.मु.नं. ३४८/२००८ मधील हुकूमनामा अंतिम हुकूमनामा होऊन मिळण्यासाठी जाबदार यांच्या विरुध्द दाखल केला होता. मात्र, असे असताना, दिनांक १८.१२.२०१८ रोजी अर्जदार गैरहजर म्हणून सदरचा अर्ज काढून टाकला आहे. ही बाब अर्जदाराला समजल्यानंतर, अर्जदारने दिनांक ०४.१२.२०२० रोजी नक्कलेसाठी अर्ज दिला व दिनांक २२.१२.२०२० रोजी नक्कला प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला. अर्जदारचे कथनानुसार

कोरोना महामारीमुळे लॉकडाऊन व कार्यालयीन कामकाजावर प्रतिबंध असल्यामुळे अर्जदारला प्रस्तुत कामी नक्कला मिळण्यास उशीर झाला. त्यामुळे, ते सदर कामी हजर राहून काम वेळेत चालवू शकले नाहीत. हे कारण संयुक्तीक वाटते. तसेच, प्रस्तुत कामी जाबदार क्र.१क हजर होऊन त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास विरोध दर्शविला असला तरी देखील पुढे त्यांनी प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १०,०००/– दंडावर मंजूर करणेस हरकत नसल्याचे कथन केले आहे.

९. अर्जदाराने दाखल केलेल्या निशाणी ३ लगत असलेल्या माझे पुर्वाधिकारी यांनी केलेल्या आदेशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, डि.फा.नं. ०९/२०१४ हा अर्जदाराने सन २०१४ मध्ये दाखल केला होता. त्यानंतर, अर्जाची नोटीस लागून जाबदार क्र.१क हजर झाले व त्यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला असला तरी, पुढे सदर अर्ज रक्कम रुपये १०,०००/– दंड रक्कमेवर मंजूर करण्यास हरकत नसल्याचे कथन केले आहे. असे असताना, नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार करता व उभय पक्षकार यांचेतील वाद कायमस्वरुपी निकालात काढण्याकरीता, न्यायाच्या दृष्टिने अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, वरील सर्व गोष्टींचा उहापोह करता, अर्जदाराने अर्जातील दिलेले कारण डी.फा.नं. ०९/२०१४ हा दावा पुन्हा फैलावर घेणे योग्य व संयुक्तीक वाटते. म्हणुन, मी **मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी** नोंदवून मुद्दा क्र.२ साठी खाली आदेश पारित करणेत येतो.

## आदेश

१. प्रस्तुत अर्ज, अर्जदार यांनी जाबदार क्र.१क यांना रक्कम रुपये २,०००/– दंडाची रक्कम देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.
(आदेश खुल्या न्यायालयात घोषित).

PANKAJA PRASAD AJGAONKAR　Digitally signed by PANKAJA PRASAD AJGAONKAR Date: 2023.10.20 17:42:15 +0530

इस्लामपूर.　　　　(पंकजा प्र.आजगांवकर)
दिनांक– २०.१०.२०२३.　　चौथे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इस्लामपूर.

| - : C E R T I F I C A T E : - | | |
|---|---|---|
| I affirm that the contents of this Pdf file order is same word as per original order. | | |
| Name of Stenographer | :- | S.N. Pethkar, |
| Court Name | :- | Pankaja P. Ajgaonkar,<br>4th Jt. Civil Judge (J.D.) and<br>J.M.F.C., Islampur |
| Date of decision | :- | 20.10.2023 |
| Order signed by P.O. on | :- | 20.10.2023 |
| Order uploaded on | :- | 20.10.2023 |